# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:21.02.2026** **वार:शनिवार**

1. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अमेरिकेच्या नेतृत्वाखाली होत असलेला आंतरराष्ट्रीय करार पॅक्स सिलिकाचं सदस्यत्व भारतानं स्वीकारलं
2. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी एआयच्या सहाय्यानं प्रभावी उपाययोजना शक्य असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन
3. एआय समीटमध्ये मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत विविध सामंजस्य करार आणि
4. वीस षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतले सुपर एट गटाचे सामने आजपासून

**<u>पॅक्स सिलिका</u>**

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अमेरिकेच्या नेतृत्वाखाली होत असलेला आंतरराष्ट्रीय करार, पॅक्स सिलिकाचं सदस्यत्व भारतानं स्वीकारलं आहे. नवी दिल्लीत आयोजित, एआय इम्पॅक्ट परिषदेत या करारवर स्वाक्षऱ्या झाल्या. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव आणि अमेरिकेचे भारतातले राजदूत सर्जियो गोर यावेळी उपस्थित होते.

आर्थिक आणि तंत्रज्ञान विषयक सहकार्य आणि पुरवठा साखळीला आधार यादृष्टीनं हा करार महत्त्वाचा आहे. या करारामुळे संगणकीय चिप्स सेमीकंडक्टर्स उद्योगात भारताला मोठा फायदा होणार असल्याचा विश्वास, अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केला. याबाबत अधिक माहिती देताना वैष्णव म्हणाले......

**भारत पैक्स सिलिका यानि सेमीकंडक्टर इलेक्ट्रॉनिक्स की वैल्यू चैन का हिस्सा बना है जिससे भारत की इलेक्ट्रॉनिक्स इंडस्ट्री को सेमीकंडक्टर इंडस्ट्री को बहुत लाभ होगा जिस तरह से आलरेडी 10 प्लांट भारत में स्थापित है। होने की प्रक्रिया में है और बहुत जल्दी पहला सेमीकंडक्टर प्लांट कमर्शियल प्रोडक्शन स्टार्ट करेगा भारत में सेमीकंडक्टर की डिजाइन चिप डिजाइन आज सबसे एडवांस त्वो नैनोमीटर की चिप्स भारत में डिजाइन हो रही है। कंप्लीट इको सिस्टम भारत में आ रहा है उसी के लिए पैक सिलिका की बहुत इम्पोर्टेंस रहेगी।**

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीत इंडिया एआय इम्पॅक्ट समिटच्या निमित्तानं काल एआय आणि डीपटेक स्टार्टअप्सच्या 16 मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांबरोबर गोलमेज बैठक घेतली. त्यानंतर, त्यांनी लिकटेंस्टाईन, स्लोव्हाक प्रजासत्ताक, श्रीलंका आणि मॉरिशस या देशांच्या नेत्यांसमवेत द्विपक्षीय बैठका घेतल्या. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस आणि पंतप्रधान मोदी यांच्यातही एक बैठक झाली. यावेळी ग्लोबल साउथशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा झाली.

**<u>एआय सर्वम</u>**

कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्यानं अन्न सुरक्षितता, वातावरणातील बदलाला सामोरे जाण्याची क्षमता, महिला सक्षमीकरणासह सर्वांगीण समृध्दी आणण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं सुरू असलेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिट -2026 मधे 'एआय इन ॲग्रिकल्चर' या विषयावरच्या चर्चासत्रात बोलत होते.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर ही बाब केवळ प्रदर्शनं आणि चर्चेपुरती मर्यादित न राहता ती मोठ्या संख्येनं लोकांपर्यंत पोहोचण्याची गरजही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. महाराष्ट्र शासनानं महाअ‍ॅग्री एआय धोरण स्वीकारलं असून हे धोरण सर्वांसाठी खुलं आणि परस्पर समन्वय साधणारं असल्याचं त्यांनी सांगितलं. नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीनं शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी भारत सरकार, जागतिक संशोधन संस्था, गुंतवणूकदार यांच्याशी महाराष्ट्र सरकार सहकार्य करण्यासाठी तयार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. या परिषदेत राज्याकडून कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून करण्यात येत असलेल्या फार्मर आयडी आणि डीजिटल शेती सर्वेक्षणाबद्दल प्रशंसा करण्यात आली. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी विकसित 'कुंभदूत' या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अ‍ॅपचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण करण्यात आलं.

राज्यातल्या अंगणवाडी सेविकांसाठी 'शिक्षासाथी' या एआय वर आधारित टूलची घोषणाही काल करण्यात आली. राज्याचा माहिती-तंत्रज्ञान विभाग आणि भारतजेन टेक्नॉलॉजी फाऊंडेशन यांच्यात काल करार करण्यात आला. तसंच राज्य शासन आणि सर्वन एआय यांच्यात सामंजस्याच्या पत्रांचं आदान-प्रदान झालं. याबाबत माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले.......

**सर्वम एआय ओपन एआय आणि आयआयटी बॉम्बे या तिघांसोबतही आपण एमओयू साईन केलेले आहेत. या माध्यमातनं जे काही एआय चे जे मॉडेल्स आहेत ते मॉडेल्स आपल्याकडे आपण तयार करणार आहोत, यूज केसेस आपण तयार करणार आहोत, वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये एआयचा उपयोग करून आणि त्याला स्केलवर कसं न्यायचं हे यांच्या माध्यमातनं आपण करणार आहोत आणि आपल्याला माहिती आहे की आता सर्वमनी इंडियाचं पहिलं एलएलएम जे आहे ते तयार केलेलं आहे. किंवा ते शोकेस केलेलं आहे, त्यामुळे त्याचा उपयोग आपण करणार आहोत. जसं चॅट जीपीटी आहे, तसं आपलं मॉडेल राज्याचं ते देखील आपण तयार करतो आहोत. मला असं वाटतं की या माध्यमातनं पुढच्या काळामध्ये राज्याच्या सर्व क्षेत्रांमध्ये एआय रेडी अशा पद्धतीचं आपलं राज्य असेल.**

**एआय-लेबल**

केंद्र सरकारने एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीनं तयार होणाऱ्या डिजिटल सामग्रीबाबत कडक मार्गदर्शक तत्त्वं लागू केली आहेत. या वर्षी 10 फेब्रुवारी रोजी अधिसूचना जारी झाल्यानंतर हे नियम कालपासून अमलात आले आहेत. आता एखादा फोटो, व्हिडिओ किंवा ऑडिओ कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीनं तयार केला असेल, तर त्यावर स्पष्टपणे तशी सूचना लावणं बंधनकारक करण्यात आलं आहे. तसंच कोणत्याही आक्षेपार्ह किंवा बेकायदेशीर सामग्रीबाबत तक्रार आल्यास समाज माध्यमांवरून ती 3 तासांच्या आत काढून टाकावी लागणार आहे. यापूर्वी ही मर्यादा 36 तासांची होती. दिल्लीत सुरू असलेल्या एआय शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिजिटल सामग्रीसाठी 'ऑथेंटिसिटी लेबल'ची गरज अधोरेखित केली होती. आता प्रत्येक एआय-निर्मित सामग्रीच्या कोपऱ्यात 'एआय जनरेटेड' किंवा तत्सम सूचना स्पष्टपणे दाखवणं अनिवार्य असणार आहे.

**अधिवेशन-मुंबई**

राज्य विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या सोमवारी म्हणजे 23 फेब्रुवारीपासून मुंबईत सुरु होत आहे. राज्यपालांच्या अभिभाषणानं अधिवेशनाची सुरुवात होणार आहे. त्यानंतर दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाचा शोकप्रस्ताव सादर करण्यात येईल. 6 मार्च रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्याचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत.

**एसआयआर**

महाराष्ट्रमध्ये निवडणूक याद्यांचं विशेष सखोल पुनरिक्षण म्हणजेच एस आय आर एप्रिलमध्ये लागू होणार असून या माध्यमातून अचूक आणि पारदर्शक मतदार याद्या निर्माण होतील. यासाठी आवश्यक तो सर्व निधी राज्य सरकार देईल अशी माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल नागपूरमध्ये दिली. नागपूर महसूल क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांच्या उद्घाटनप्रसंगी ते काल प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

**सिंधुदुर्ग-डॉल्फिन**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण समुद्रात एकाच वेळी सुमारे 70 ते 75 डॉल्फिनचा कळप दिसल्याची अलीकडेच नोंद झाली. पर्यटकांसह स्थानिकांसाठी हे अत्यंत दुर्मिळ आणि रोमांचक दृश्य ठरलं. ऐकुयात याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.......

**तारकर्ली देवबाग समुद्र पट्ट्यात डॉल्फिनच दर्शन नेहमी घडत असलं तरी एवढ्या मोठ्या संख्येने कळप एकत्र फिरताना पहिल्यांदा स्पष्टपणे दिसून आल्याच सांगितल जातय. सागरी जीव अभ्यासक विशाल भावे यांनी या कळपाच विहंगम दृश्य ड्रोन कॅमेऱ्यातून टिपल. शांत लाटांमध्ये समांतर हालचाली करत अधून मधून पाण्याबाहेर उड्या मारत पुढे सरकणाऱ्या डॉल्फिनमुळे समुद्रकिनारा काही काळ मंत्रमुग्ध झाला. स्थानिक मच्छिमार आणि बोट चालकानी सुद्धा या हालचालीची पुष्टी केली असून समुद्रातल्या जैवविविधतेसाठी हा सकारात्मक संकेत मानला जातोय. या परिसरात आढळणारे इंडियन ओशन हम्पबॅक डॉल्फिन सहसा कळपांने फिरतात. किनारपट्टी लगतच्या उथळ पाण्यात खाद्य शोधतात. हवामानातली स्थिरता, पाण्याची गुणवत्ता आणि मासळीची उपलब्धता या घटकांमुळे मोठे कळप एकत्र दिसू शकतात. मात्र असं असलं तरी तज्ज्ञांच्या मते डॉल्फिनच्या नैसर्गिक वर्तनात बदल होऊ नये यासाठी बोटींचा वेग नियंत्रित ठेवण, कळपापासून सुरक्षित अंतर राखण आणि आवाज प्रदूषण टाळणं यासारख्या मार्गदर्शक तत्वांच पालन करणं महत्वाचं आहे. भविष्यात मॉनिटरिंग, जनजागृती, जबाबदार पर्यटन यावर भर दिल्यास सिंधुदुर्गच्या समुद्र संपदेच दीर्घकालीन संरक्षण शक्य होईल. आकाशवाणी बातम्यांसांठी सिंदूदुर्गहून निलेश जोशी.**

**महापौर-ठाणे**

ठाणे जिल्ह्यातल्या भिवंडी निजामपूर महापालिकेच्या महापौरपदी भाजपचे बंडखोर आणि धर्मनिरपेक्ष आघाडीचे नारायण चौधरी विजयी झाले तर उपमहापौरपदी काँग्रेसचे तारीक मोमीन निवडून आले आहेत. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नारायण चौधरी यांना भिवंडी धर्मनिरपेक्ष आघाडीतर्फे महापौर पदाची उमेदवारी जाहीर केली होती. चौधरी यांना 48 तर उपमहापौर मोमीन यांना 43 मतं पडली. दरम्यान, भाजपाच्या पक्षादेशाविरोधात बंडखोरी करणारे नारायण चौधरी आणि त्यांच्याबरोबरच्या नगरसेवकांवर कारवाईचा इशारा भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत दिला आहे.

**जांभेकर-सिंधुदुर्ग**

मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आणि थोर समाजसुधारक 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी दिल्लीत त्यांना पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केलं. दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त काल त्यांना अभिवादन करण्यात आलं. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ओरोस इथं पत्रकार भवनात जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**क्रिकेट**

वीस षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सुपर एट गटाचे सामने आजपासून सुरु होत आहेत. पहिला सामना पाकिस्तान आणि न्यूझीलंड दरम्यान कोलंबो इथं होईल. भारत, वेस्ट इंडीज, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, श्रीलंका, न्यूझीलंड, झिम्बॉब्वे, आणि पाकिस्तान हे संघदेखील सुपर एटमधे पोहोचले आहेत. भारताचा सामना उद्या दक्षिण आफ्रिकेबरोबर अहमदाबाद इथं होणार आहे. दरम्यान, या स्पर्धेच्या साखळी अखेरच्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं ओमानचा 9 गडी राखून प्रभाव केला.

**हवामान**

राज्यात सर्वत्र हवामान कोरडं असून मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.